दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ४० • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.४ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

## लाडक्या बहिणींना करावी लागणार वर्षभराची प्रतिक्षा
# २१०० रुपयांसाठी भाऊबीजेचा मुहूर्त सुधीर मुनगंटीवारांनी केले स्पष्ट

**मुंबई (वृत्तसंस्था)**
महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुतीने सत्ता स्थापन केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी महायुतीच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजनेच्या रकमेत वाढ करत २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. सरकार स्थापन झाल्यावर खरेच रकमेत वाढ होणार की केवळ निवडणुकीसाठी आश्वासन आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी उत्तर दिले आहे.
एका वृत्तपत्राला मुलाखत देताना सुधीर मुनगंटीवार यांना प्रश्न विचारण्यात आला की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दिल्या जाणाऱ्या रकमेत वाढ करू. महिलांना १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. ते आश्वासन पूर्ण कराल का? करण राष्ट्रवादीने म्हंटले आहे की हे आश्वासन केवल एकनाथ शिंदे यांचे होते. यावर उत्तर देताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, आम्ही १०० टक्के ते आश्वासन पूर्ण करू. महिलांना दिली जाणारी रक्कम १५०० रुपयांवरून २१०० रुपये अशी वाढवली नाही तर देशात आमची प्रतिमा खराब होईल. निवडणुका जिंकल्यावर आश्वासन पूर्ण न करणारे अशी



आमची प्रतिमा देशभर पसरवली जाईल. पुढे बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहे की आपण आपल्या शब्दांवर ठाम राहायला हवे. महायुतीचा जाहीरनामा समितीचा अध्यक्ष या नात्याने मी आमच्या जाहिरनाम्यातून, संकल्प पत्रातून दिलेली आश्वासने धुळीस मिळू देणार नाही. आमच्या सरकारमध्ये प्रत्येक पात्र महिलेला २१०० रुपये देण्याची क्षमता आहे. मला वाटत नाही की आमचा कोणताही मित्रपक्ष याला विरोध करेल. ही वाढीव रक्कम कोणत्या महिन्यापासून द्यायची यावर चर्चा केली जाईल. आम्ही गेल्या वर्षी भाऊबीजेच्या दिवशी ही योजना लागू केली होती. त्यामुळे आम्ही पुढील वर्षी भाऊबीजेपासून रक्कम वाढवू शकतो, असे सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे.विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी महायुतीने लाडकी बहीण योजनेचा देखील चांगलाच प्रचार केला होता. याचा फायदा निवडणुकीत मतदानातून झाला असल्याचे दिसत आहे. तसेच महायुतीच्या नेत्यांनी त्यांच्या या विजयाचे श्रेय लाडक्या बहिणींनाच दिले आहे. तसेच लाडकी बहीण योजना ही महिलांना थेट आर्थिक लाभ देणारी योजना निवडणुकीत निर्णायक ठरली असल्याचे मत देखील राजकीय विश्लेषकांनी मांडले आहे.

## वरोर्यात अवैध गौण खनिज वाहतुकीवर कारवाई, तीन ट्रॅक्टरसह मुद्देमाल जप्त

**वरोरा । प्रतिनिधी**
तहसील प्रशासनाने वरोर्यात अवैध गौण खनिज वाहतुकीवर धडक कारवाई केली असून, तीन ट्रॅक्टरसह एकूण ३ ब्रास रेती जप्त केली आहे. ही कारवाई ३ डिसेंबर रोजी पहाटे करण्यात आली.
मौजा सूर्ला येथील नदी घाटावरून एक ब्रास रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त.मौजा खांबडा येथे अवैधरित्या रेती वाहतूक करणारा दुसरा ट्रॅक्टर जप्त.मौजा सुसा येथे एक ब्रास रेतीसह आणखी एक ट्रॅक्टर जप्त.तिन्ही ट्रॅक्टरसह ट्रॉली आणि रेतीचा मुद्देमाल तहसील कार्यालय, वरोर्यात जमा करण्यात आला आहे.
सदर कारवाई तहसीलदार वरोर्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत मंडळ अधिकारी अजय निखाडे (शेगाव बु.), तलाठी अमोल घाटे (चीनोरा), आणि शिपाई सचिन शेळकी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.
या कारवाईमुळे प्रशासनाने अवैध खनिज वाहतुकीविरोधात उचललेले पाऊल जनतेमध्ये कौतुकास्पद ठरत आहे. पुढील



तपास सुरू असून या मोहिमेमुळे अवैध वाहतुकीवर नियंत्रण येण्याची अपेक्षा आहे.
**दलाल सक्रिय:**वरोरा शहरालगतच्या मार्डा, करंजी, तुळाना या घाटांवर मध्यरात्री मोठ्या प्रमाणात रेती तस्करी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. या ठिकाणी काही दलाल सक्रिय असून, ते तहसील कार्यालयात वावरणाऱ्या अधिकाऱ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवतात. अधिकारी मोहिमेवर निघाल्याची कुणकुण लागताच तस्करांना माहिती देणे, तसेच कारवाईच्या ठिकाणी जाऊन तस्करांना वाचवण्यासाठी सेटलमेंट करण्याचे काम ही दलाल मंडळी करत असल्याची चर्चा आहे.या परिस्थितीत प्रशासनाने दलालांवरही कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.
**महसूल वसुलीचा यशस्वी टप्पा:**१ ऑगस्ट २०२४ पासून आजपर्यंत तहसील प्रशासनाने अवैध उत्खनन व वाहतूक करताना एकूण ५० वाहने जप्त केली असून, शासन खजिन्यात रु. ६३,७३,४००/- इतका महसूल जमा करण्यात आला आहे.

## एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत असे जनतेला वाटणे स्वाभाविक–गुलाबराव पाटील


**जळगाव (वृत्तसंस्था)**
एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत असे जनतेला वाटणे स्वाभाविक आहे. सगळ्या घटकांची कामे केल्यामुळे सहाजिकच जनतेची भावना आहे की त्यांनी मुख्यमंत्री व्हावे, असे शिवसेना नेते गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे. तर पुढे बोलताना ते म्हणाले की, या विषयात स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझा कुठलाही अडचणीचा विषय नाही या शब्दात हा विषय खोडून टाकला आहे.गुलाबराव पाटील म्हणाले की, आदित्य ठाकरे हा सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेला माणूस आहे. आंदोलन करून आज आम्ही त्यांना मोठे केलेला आहे. नाहीतर आज ज्यांनी शिवसेनेला मोठे केले ते लोक कुठे आहेत, हे राऊत यांना विचारा असा टोला त्यांनी लगावला आहे. तर उद्धव ठाकरे यांनी संजय राऊत यांना ओळखावे नाही तर जे उरलेले २० आहेत ना त्यांच्यातील १० आमच्याकडे यायच्या तयारीत आहेत, असा खळबळजनक दावा पाटील यांनी केला. दिवाकर रावते कुठे आहेत, लीलाधर ढाके कुठे आहेत. महाडिकांच नाव कधी घेतलं जातं नाही. या सर्वांना ते विसरले आहेत.



त्या महालामध्ये आमच्यासारख्याची सुद्धा एक वीट आहे. या सर्वांना विसरले म्हणून ते संजय राऊत सारखा एक दगड घेऊन आलेगुलाबराव पाटील म्हणाले की, सर्वप्रथम संजय राऊत यांना ॲडमिट केले पाहिजे त्यांनी पहिले शिवसेना संपवली आता राष्ट्रवादी संपवित आहेतसंजय राऊत पागल झाले आहेत. ते मेंटल झाल्यामुळे त्याच्या हातात आता दगड द्या. त्याने हातात दगड घ्यावे आणि भिवंडीच्या बाजारात फिरावे, असा सल्ला संजय राऊतांना दिलाय. येत्या काळात एकनाथ शिंदेंना संपूर्ण अधिकार हे शिवसेना पक्षाने दिलेले आहेत. त्यामुळे आता पुढे जे काही निर्णय घेतले जातील ते फक्त एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातूनच घेतले जातील.गुलाबराव पाटील यांचे जळगावमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून बॅनर लावले आहेत. त्यावर शेवटी कार्यकर्ते उत्साही असतात.. शेवटी आमचा नेता एकच आहे आणि त्याचं नाव एकनाथराव जी शिंदे आहे. त्या आदेश करतात त्या पद्धतीने आम्ही काम करत असतो. पुढच्या काळातही आम्ही त्याच पद्धतीने काम करत राहू असे गुलाबराव पाटील यांनी स्पष्ट केले आहे.दोन दिवसांपूर्वी बोलताना गुलाबराव पाटील म्हणाले, बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की ज्या दिवशी मी काँग्रेससोबत युती करेल त्या दिवशी मी माझे दुकान बंद करेल. पण आता लेट आले दुरुस्त आले असे म्हणावे लागेल. हे त्यांच्याही लक्षात आले आहे की ज्या दिवशी आपण हिंदुत्व, देश, धर्म आणि राज्य सोडतो त्यावेळेस काय चित्र होते हे दानवेंच्या लक्षात आले आहे. आणि मला तरी असे वाटते की शिवसेनाप्रमुखांचे विचार सोडलेल्या माणसाला आज पश्चाताप होतोय, परमेश्वर त्यांचे भले करो.

## शपथविधी सोहळ्यासाठी डॉ.नामदेव शास्त्री यांना निमंत्रण

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
राज्यातील नवीन सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांना निमंत्रित करण्यात आले आहे. ५ डिसेंबरला मुंबई येथील आझाद मैदानावर नवीन सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा आयोजित केला आहे.
या सोहळ्यासाठी भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांना सरकारने विशेष निमंत्रण दिले आहे. भगवानगडाच्या दृष्टीने ही भूषणाव बाब असून भगवानगडाचा सन्मान सरकारने केला आहे. यापूर्वीही पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नाशिक या ठिकाणी काळा राम मंदिरात आले होते. त्यावेळीही



भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांना निमंत्रण दिले गेले होते. त्याप्रसंगी नरेंद्र मोदी व डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांची भेट घडून आली होती.

## माझ्यावर अन्याय झाला असे म्हणणे चुकीचे प्रतोदपद नियुक्तीवर रोहित पवारांची प्रतिक्रिया

**पुणे (वृत्तसंस्था)**
प्रतोदचे काम महत्वाचे असते परंतु आमच्याकडे नेते राहिले नाही. शरद पवार यांना नवीन नेतृत्वाला संधी देऊन घडवयाचे आहे. मी जो संघर्ष आतापर्यंत केला आहे, त्यानुसार योग्य पद मला आगामी काळात पक्षाकडून दिले जाईल असे मत आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.
रोहित पवार म्हणाले, माझ्या आमदारकीला पाच वर्ष पूर्ण झाले असून मुख्य प्रतोदचे काम काय असते याचा अंदाज मला आहे. मी त्या पदावर पुन्हा बसण्यापेक्षा एखाद्याला संधी द्यावी असा प्रस्ताव पक्षाच्या बैठकीत मी मांडला. त्यामुळे माझ्यावर अन्याय झाला असे म्हणणे हे चुकीचे आहे. आगामी काळात संवैधानिक पदाची संधी माझ्यासारख्याला मला मिळू शकते. पक्षात जी पदे दिली गेली आहे, ती विचार करुन दिली गेली आहे. आमच्या समितीने नाव ठरवली असून पक्ष प्रमुख शरद पवारांनी त्यावर शिक्कामोर्तब केला आहे.
रोहित पवार म्हणाले, महायुतीच्या नेत्यांना सर्व राज्यातील विविध ठिकाणी समान आसपास मते मिळाल्याचे ईव्हीएम मशीन मधून दिसून येते. काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेस हे ईव्हीएम बाबत खुलासा करण्यासाठी पुढाकार घेत आहे. नागरिकांच्या देखील ईव्हीएम बाबत शंका असून त्या आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीपूर्वी दूर केल्या पाहिजे. महायुतीला २२० पेक्षा अधिक जागा मिळाल्या असून नऊ दिवसानंतर राज्याला मुख्यमंत्री मिळत नाही किंवा मंत्रीमंडळ विस्तार होत नाही, त्यामुळे लोकांनी मते देऊन चूक केली का? असे वाटू लागले आहे.बसच्या दरात १४ टक्के वाढ करण्याच प्रस्ताव एसटी महामंडळाकडे आला आहे. व्यवसायिक गॅस १६ टक्के वाढ झाली असल्याने १७२ रुपयाने सदर गॅस महागलेला आहे. योजनादूत यांना दोन महिन्याचा पगार देण्यात आलेला नाही. महायुतीला ईव्हीएमने मदत केल्याने बाकी लोकांची काही मदत झाली नाही, असे त्यांना वाटत आहे. न्यायालयाच्या भरतीत देखील कंत्राटी भरती होणार आहे, याला आमचा विरोध असणार आहे.सरकारने लाडकी बहीण योजना काढली परंतु आता भाजप त्यामध्ये सर्शत अटी टाकण्याचा विचार करत आहे. सरकार २१०० रुपये महिलांना देणार की नाही, ज्या वंचित महिला योजनेपासून दूर राहिल्या त्यांना आगामी काळात समाविष्ट केले जाणार की नाही, याबाबत अधिवेशनात आम्ही मुद्दे मांडणार आहे. परंतु अधिवेशन कधी होणार, आम्हाला बोलण्याची संधी दिली जाणार का? हे प्रश्न आहे.

## कॅफेच्या नावा खाली अश्लील चाळे पोलिसात गुन्हा दाखल

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
अहिल्यानगर महाविद्यालयीन मुला-मुलींना कॅफेच्या नावाखाली



अश्लील चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणा-या कॅफे चालक व मालक यांचेवर कोतवाली पोलीसांची कारवाई करून एकजण ताब्यात घेतला आहे. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
शिवप्रसाद कुमार (वय २० रा. प्ररबुजुर्ग फतेहपुर उत्तर प्रदेश ह.रा. स्वामी शंकर हॉटेल कल्याण बायपास अहिल्यानगर), महेश पोपट खराडे (रा. रभाजीनगर केडगाव अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्याची नावे आहेत. तसेच महाविद्यालयीन मुले व मुलींना समज देऊन सोडण्यात आले. ही कारवाई कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने केली.

# लोकशाहीचा खून झाला तर राज्य घटनेला अर्थ उरणार नाही–चव्हाण

**मुंबई (वृत्तसंस्था)–** ईव्हीएममध्ये पोग्रामिंग करणे शक्य आहे. जगातील प्रगत देशांमध्ये ईव्हीएमवर निवडणुका होत नाहीत. भारतात हट्टाने ईव्हीएमवर निवडणुका घेतल्या जात आहेत. भारतातील लोकशाही टिकावी, ही जगातील लोकशाही प्रेमी नागरिकांची इच्छा आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत आणि निकालाबाबत सामान्य नागरिकांच्या मनात संशयाचे वातावरण आहे. केंद्रीय निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारने जनतेमधील संशय दूर केला पाहिजे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले.
अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या माजी अध्यक्षा, सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा, कर्तव्य आणि त्याग सप्ताहाचे उद्घाटन पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार रवींद्र घंगेकर, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस संजय बालगुडे , माजी नगरसेविका लता राजगुरू, अविनाश बागवे, दत्ता बहिरट , सौरभ अमराळे, सदानंद शेट्टी, कैलास कदम आणि सप्ताहाचे आयोजक व माजी आमदार, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यावेळी उपस्थित होते.चव्हाण म्हणाले, देशातील लोकशाही आणि राज्य घटनेवा गंभीर धोका निर्माण झाला आहे. देशात लोकशाही आहे का , हा मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे. लोकशाही देशात चढ उतार येतात. परंतु, सध्याचा निकाल आश्चर्यकारक आहे. लोकशाही पद्धतीने निवडणूक घेतली हे सिद्ध करण्याची जबाबदारी निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारची आहे. लोकशाहीचा खून झाला तर राज्य घटनेला अर्थ उरणार नाही. सामान्य लोकांचा विश्वास बसेल यासाठी सरकारला प्रयत्न करावे लागतील. सोनिया गांधीं यांनी पंतप्रधानपदाचा त्याग केला या क्षणाचा मी साक्षीदार आहे. १९९१ ला सोनिया गांधी यांनी केवळ इच्छा व्यक्त केली असती तरी त्या पंतप्रधान झाल्या असत्या. २००४ चा विजय सोनिया गांधींचा होता. त्यांच्या जाहीरनाम्यावर लोकांनी मते दिली. तरीही त्यांनी पंतप्रधानपद स्वीकारले नाही. माहितीचा अधिकार, अन्न सुरक्षा कायदा , मनरेगा हे कायदे आणि योजना ही सोनिया गांधी यांची दूरदृष्टी आहे. राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या माध्यमातून त्यांनी मोठे काम केले आहे. पवार म्हणाले, सत्तेत बसलेले लोक भारतीय संस्कृतीचे ठेकेदार नाहीत. सोनिया गांधींनी भारतीय संस्कृती जपली आहे. राजीव गांधी यांच्या मृत्यूनंतर त्या देश सोडून गेल्या नाहीत. त्यांनी भारताची सेवा केली. आज महात्मा गांधी, पं. नेहरू , इंदिरा गांधी यांची प्रतिमा मलिन करण्याचा डाव सुरू आहे. त्याविरोधात रस्त्यावर उतरले पाहिजे.



# करमाळा तालुक्याच्या विकासासाठी सदैव तत्पर-प्रा.रामदास झोळ

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील जनता आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी असून करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक गावामध्ये प्रा. रामदास झोळ फाउंडेशनच्या माध्यमातून समाजकारणात राजकारणात कार्यरत राहणार असल्याचे मत प्रा. रामदास झोळ यांनी व्यक्त केले. करमाळा विधानसभा निवडणुकीनंतर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक कार्यकर्ता विचारविनिमय बैठकीत ते बोलत होते. प्रा. रामदास झोळ संपर्क कार्यालय विकासनगर, करमाळा येथे ही बैठक संपन्न झाली. या बैठकीस शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ आण्णा कांबळे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हरिभाऊ मंगवडे ओबीसी तालुका अध्यक्ष गफूर शेख तालुका उपाध्यक्ष आनंद झोळ, दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिव मायाताई झोळ , पोलीस मित्र संघटनेचे तालुकाध्यक्ष संभाजी शिंदे, वाशिंबेचे माजी सरपंच भगवान डोंबाळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र गोडगे, जिल्हा युवा नेते गणेश मंगवडे , तालुका उपाध्यक्ष सुहास काळे पाटील, संजय जगताप श्रीकांत साखरे पाटील, राजेंद्र वीर, भिमराव ननवरे. तुकाराम गवळी तांदुळवाडी, भरत वायकर प्रणव जाधव यांच्यासह करमाळा माढा तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रा. रामदास झोळ म्हणाले की, करमाळा ही आपली जन्मभूमी असून त्याचे ऋण फेडण्यासाठी बारामती, पुणे, इंदापूर या शहराप्रमाणे करमाळा तालुक्याचा विकास करण्यासाठी आपण कटीबद्ध असून, संवैधानिक पदांच्या माध्यमातून तालुक्यातील रस्ते, पाणी, वीज तसेच शिक्षण, आरोग्याच्या समस्या सोडवता येत असल्याने विधानसभेची निवडणूक आपण लढवली आहे. जरी आपला पराभव झाला असला तरी परिवर्तनाच्या या लढाईमध्ये शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, युवक, महिलांचा मिळालेला पाठिंबा नक्कीच मला बळ देणार असून जनतेच्या कल्याणासाठी येणाऱ्या जिल्हा परिषद,



पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका निवडणुका गावागावामध्ये शाखा काढून कार्यकर्त्यांना त्यामध्ये सहभागी करून समाजकारणातून राजकारण करण्याचा मानस असल्याचे प्रा. रामदास झोळ सर यांनी सांगितले. कार्यकर्ता विचार विनिमय बैठकीत विविध कार्यकर्त्यांनी आपली मते मांडली यामध्ये काहींनी पक्षीय राजकारणात सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. तर काहींनी पदवीधर मतदार संघातुन निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली. पुढच्या काळामध्ये प्रत्येक गावामध्ये आपली शाखा निर्माण करून अकरा सदस्याचे मंडळ व सहयोगी सदस्य म्हणून झोळ परिवार निर्माण करण्याची मागणी केली. करमाळा तालुक्यात शैक्षणिक उपक्रमावर भर देऊन उएढ, छएएढ, गएए शिक्षणाची सोय करण्याची मागणी कार्यकर्त्यांनी केली. आपण सर्व तालुक्यांमध्ये आपली ताकद दाखवल्यानंतर, तालुक्यातील कुठल्याही गट आपणाला विचारात घेऊन युती करून निवडणूक लढवण्याची इच्छा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. करमाळा तालुक्यात झोळ फाउंडेशनच्या शाखा मार्फत नागरिकांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देणे. रस्ते, पाणी, वीज या प्रश्नांच्यासाठी लढत राहून सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्यासाठी झोळ परिवाराची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे मनोगत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. यावर सर्वस्वी निर्णय घेण्याचा अधिकार प्रा. रामदास झोळ यांना असून त्यांनी जो निर्णय घेतील तो शिरसावंद्य मानून काम करणार असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. यावर प्रा. रामदास झोळ सर यांनी पुढच्या काळामध्ये सर्व निवडणुका स्वबळावर लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे . कमी कालावधीमध्ये जनतेचे भरभरून प्रेम मिळाले शेतकरी हितासाठी आंदोलनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ऊस बिल मिळवून दिले आहे. गावागावामध्ये टँकरने पाणी पुरवठा, बाकडे वाटप, विद्यार्थ्यांना शैक्षणिक पॅड वाटप, नवरात्रात भक्तांना मोफत देवदर्शन यात्रा, मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलना पाठबळ देण्यासाठी चार चाकी गाडयांना इंधन देण्याचे काम सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून केले आहे. करमाळा तालुक्यातील ११८ गावे माढा तालुक्यातील छत्तीस गावे यांनी केलेले प्रेम स्वागत नक्कीच प्रेरणादायी असून कार्यकर्त्यांनी हिम्मत ना हरता नवीन वर्षात संकल्प करून गाव तिथे आपला माणूस आपले विचार पोहोचण्यासाठी कार्यरत राहावे. उद्याचा सूर्य नक्कीच आपणास यशाच्या शिखरावर नेणार आहे. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ आण्णा कांबळे म्हणाले की, करमाळा तालुक्यात प्रा. रामदास झोळ सर

**करमाळा तालुक्यातील गटातटाच्या राजकारणाला सर्वसामान्य नागरिक जनता**



**कंटाळली असून, सुशिक्षित, संस्कृत, नेतृत्व म्हणून प्रा. रामदास झोळ यांचे नेतृत्व जनतेला हवे आहे. प्रा. रामदास झोळ फाउंडेशनच्या शाखा करमाळा तालुक्यात काढुन गावागावांमध्ये झोळ परिवाराची ताकद निर्माण करून, आगामी निवडणुका प्रा. रामदास झोळ सर यांच्या नेतृत्वाखाली लढवण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. असे आवाहन शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ आण्णा कांबळे यांनी व्यक्त केले आहे.**

फाउंडेशनच्या शाखा काढुन गावागावात कार्यकर्त्यांचे संघटन उभा करून त्यांना पाठबळ देऊन करमाळा तालुक्यात राजकारणात सक्रिय सहभाग घेऊन करमाळा तालुक्याच्या विकासासाठी काम करणार असल्याचे दशरथ आण्णा कांबळे यांनी विचार विनिमय बैठकीत व्यक्त केले. करमाळा तालुक्याच्या येणाऱ्या निवडणुकीत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका या निवडणुकीत आपले किमान वीस प्रतिनिधी तरी दिसणार अशी आशा आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी आता नवीन वर्षामध्ये संकल्प करून गाव तिथे प्रा. रामदास झोळ यांचा परीवार मजबूत करण्यासाठी फाउंडेशनच्या शाखा काढण्यासाठी कामाला लागावे. येणारा काळ आपल्याला नक्कीच मोठे यश देणार आहे. या बैठकीचे प्रास्ताविक श्रीकांत साखरे पाटील यांनी केले सूत्रसंचालन गोपीनाथ पाटील तर आभार स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे गणेश मंगवडे यांनी मानले.

## करमाळ्यात १६ फेब्रुवारीला सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**सोलापूर । प्रतिनिधी**

श्रीराम प्रतिष्ठान, करमाळा यांच्या वतीने १६ फेब्रुवारी रोजी सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गणेश चिवटे यांनी ही माहिती दिली.



गेल्या दोन वर्षांपासून प्रतिष्ठानच्या माध्यमातून तालुक्यातील गोरगरीब शेतकरी कुटुंबांतील मुला-मुलींची मोफत लग्न लावली जात आहेत. २०२३ मध्ये २१ तर २०२४ मध्ये ३१ विवाह सोहळे यशस्वीरीत्या पार पाडले आहेत. यंदाच्या सोहळ्यात वधू-वरांना आवश्यक सर्व सुविधा दिल्या जाणार असून सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नोंदणीसाठी जि.एन.सी. मिल्क सेंटर (करमाळा, कोर्टी, वरकुटे, घारगाव), भाजपा संपर्क कार्यालय (गायकवाड चौक, करमाळा) आणि श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था (दत्तपेठ, करमाळा) येथे संपर्क साधावा, असे आवाहन प्रतिष्ठानकडून करण्यात आले आहे.

## ह.भ.प.प्रज्ञा पंडित यांचे जेजुरी गडावर श्री मल्हार स्तोत्र निरूपण

**बीड । प्रतिनिधी**

श्री मार्तंड देवसंस्थान आणि श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने श्री मल्हार स्तोत्र निरूपण या विशेष कार्यक्रमाचे आयोजन ७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते १२ दरम्यान करण्यात आले आहे.या कार्यक्रमात सुप्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. प्रज्ञाताई पंडित यांचे निरूपण होईल. प्रा. प्रज्ञा पंडित या हिंदू वेद-पुराणातील स्तोत्र आणि विष्णू सहस्रनामावर सखोल निरूपण करणाऱ्या ठाण्यातील एकमेव प्रवचनकार आहेत. त्यांनी 'प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग' उपक्रमातून जगभरातील भक्तांना वेद-शास्त्रांतील शंभराहून अधिक स्तोत्र शिकवले आहेत.



कार्यक्रमाचे आयोजन मनिषा राजेंद्र खेडेकर यांनी केले असून त्या श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्टच्या अध्यक्षा आणि स्मायर फार्मास्युटिकल्सच्या संचालिका आहेत.या अध्यात्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन देवस्थान विश्वस्त मंडळाने केले आहे.

## बेपत्ता इसमाचा सात दिवसांनी मृतदेह आढळला

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

वेड्सर येथून २६ नोव्हेंबर रोजी बेपत्ता झालेल्या इसमाचा मृतदेह आलेवाही बिटाच्या जंगलात सोमवारी (२ डिसेंबर) आढळून आला. मृत इसमाचे नाव मारोती सोमा कुंबले (वय ५८) असून, तो नागभीड तालुक्यातील वाढोणा गावाचा रहिवासी होता.

मारोती कुंबले २६ नोव्हेंबर रोजी बेपत्ता झाल्यानंतर त्याच्या पत्नी व मुलाने २८ नोव्हेंबर रोजी तळोधी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली होती. यावेळी कुंबले वेड्सर येथे असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली होती. दरम्यान, आलेवाही वनपरिक्षेत्रातील जंगलात सरपण गोळा करणाऱ्या काही महिलांना मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती वनविभाग व पोलिसांना देण्यात आली.पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मृतदेह ताब्यात घेतला. मृतदेहाच्या शर्टवरून त्याची ओळख पटवण्यात आली. तो बेपत्ता मारोती कुंबले असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस निरीक्षक संगीता हेलोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत लांबट व पोलीस अमलदार रत्नाकर देहारे प्रकरणाचा तपास करत आहेत.या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून मृतदेह सापडण्याच्या कारणांबाबत पोलिस तपास सुरू आहे.

## चिमुर वनविभागाचा शेतकऱ्यां वरील अन्याय थांबणार का?

**चिमुर । शेषराव राऊत**

तालुक्यातील खडसंगी आणि वरोरा तालुक्यातील काही गावांमध्ये चिमुर वनपरिक्षेत्रांतर्गत रानडुक्कर, वाघ, जंगली माकडे यांचा धुमाकूळ सुरू आहे. या जंगली प्राण्यांमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर पीक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. सोयाबीन आणि अन्य पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर होत असूनही वनविभागाकडून मिळणारी नुकसानभरपाई अत्यल्प असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.वनपरिक्षेत्र अधिकारी देवुळकर यांच्यावर शेतकऱ्यांना जाणूनबुजून कमी नुकसानभरपाई देत असल्याचा आरोप होत आहे. दोन-तीन हजार रुपयांच्या स्वरूपात



भिकेसारखी भरपाई देण्यात येत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. या गंभीर समस्येकडे स्थानिक लोकप्रतिनिधीही दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.


भिम आर्मी संविधान रक्षक दलाचे चिमुर तालुका अध्यक्ष जगदीश मेश्राम यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करून अधिकारी देवुळकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आमदार किर्तीकुमार भागंडिया यांच्याकडे केली आहे. तसेच शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे.शेतकऱ्यांच्या समस्यांकडे अधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देऊन तत्काळ उपाययोजना करावी, अन्यथा आंदोलन उभारण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## अरुणा काकडेचे अपहरण की घातपात? शोध अद्यापही अपूर्ण

**चिमूर । प्रतिनिधी**

व्यापारी असोसिएशन चिमूरच्या सदस्या आणि देवांश जनरल स्टोअर्सच्या संचालिका अरुणा अभय काकडे या पाच दिवसांपासून बेपत्ता आहेत. त्यांच्या अचानक गायब होण्यामुळे अपहरण झाले की घातपात, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. या प्रकरणाचा तातडीने तपास करून काकडे यांचा शोध लावण्याची मागणी व्यापारी असोसिएशनने पोलीस निरीक्षक संतोष बाकल यांना निवेदनाद्वारे केली आहे.

दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी, अरुणा काकडे या चिमूरहून नागपूर येथील ईतवारी मार्केटमध्ये दुकानासाठी सामान खरेदी करण्यासाठी गेल्या होत्या. मिळालेल्या माहितीनुसार, त्या चिमूरहून नागपूर



बसस्थानकावर उतरून ऑटोरिक्षाने ईतवारी भागात गेल्या होत्या. त्यानंतर, भंडारा रोड येथील बाटा शोरूमसमोरून त्या अचानक बेपत्ता झाल्या. काकडे यांचा ठावठिकाणा लागत नसल्यामुळे त्यांच्या नातेवाईकांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.पाच दिवसांचा कालावधी उलटूनही काकडे यांचा शोध लागलेला नसल्यामुळे व्यापारी असोसिएशनने संताप व्यक्त केला आहे. त्यांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून काकडे यांचा तातडीने शोध घेण्याची मागणी केली आहे.यावेळी व्यापारी मंडळाचे अध्यक्ष प्रवीण सातपुते, सचिव बबन बनसोड, प्रशांत गगपल्लीवर, घनश्याम चांदेकर, अभय धोपटे, आशिष असावा, विनोद शर्मा, अॅडव्होकेट लांबट आणि महिलांसह अनेक सदस्य उपस्थित होते.या घटनेने व्यापारी वर्गात चिंता आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करून प्रकरणाचा उलगडा करावा, अशी व्यापाऱ्यांची मागणी आहे.३

### सरस्वती मधील बोगस मान्यतेवर कारवाई नाही?

## सचिन जगताप यांची भूमिका संशयास्पद असल्याचा शिक्षक भारतीचा आरोप

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील सरस्वती विद्यालय वरकुटे या शाळेतील नितेश कोरडे यांची २०२१ मधील शिक्षक पदाची नियुक्ती व वैयक्तिक मान्यता बोगस असल्याने शाळेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्याकडे करण्यात आलेली आहे.

याप्रकरणी नितेश कोरडे यांची नियुक्ती २०२१ मध्ये दाखवून फेब्रुवारी २०२३ मध्ये तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकारी भास्करराव बाबर यांच्या सहीची बनावट वैयक्तिक मान्यता घेतल्याची कागदपत्रे शाळेकडून तयार करण्यात आली आहेत. जून २०२४ मध्ये या शाळेच्या संस्थेने शिक्षण विभागास लेखी पत्राद्वारे शाळेत एकच शिक्षक कार्यरत असल्याने अतिरिक्त शिक्षक मिळावा अशी मागणी केलेली आहे. जून २०२४ मध्ये तात्पुरत्या स्वरूपात शाळेत घेतलेल्या नितेश कोरडे यांची २०२१ मध्ये नियुक्ती दाखवून बोगस मान्यता कागदपत्रे तयार करण्यात आली आहेत. शालार्थ प्रणालीत नाव समाविष्ट करण्यासाठी वेतन पथकाकडे प्रस्ताव न देता माध्यमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्या स्वाक्षरीने परंतु सचिन जगताप यांच्या कालावधीत सदर प्रस्ताव उपसंचालक कार्यालयास शाळेकडून पाठवण्यात आला आहे. नितेश कोरडे यांच्या वैयक्तिक मान्यतेची नोंद माध्यमिक विभागातील जावक रजिस्टर मध्ये नाही. वेतन पथकात शालार्थ प्रस्तावाची नोंद नाही. तसेच भरती-बंदीच्या काळात कोणताही शासन निर्णय नसताना बेकायदेशीर नियुक्ती करून बोगस मान्यता घेतल्या बाबत शिक्षण उपसंचालक यांनी ३ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षण



अधिकारी यांना पत्रव्यवहार करून स्वयं स्पष्ट अभिप्राय मागवला आहे.

शिक्षक भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी या बोगस मान्यते विरोधात सचिन जगताप यांच्याकडे ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी तक्रार देऊन फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. या तक्रारीकडे शिक्षणाधिकारी दुर्लक्ष करत असल्याने संघटनेच्या वतीने ०७ नोव्हेंबर २०२४ रोजी पुन्हा स्मरणपत्र देण्यात आलेले आहे. सदर शाळेतील बोगस मान्यता हा अत्यंत गंभीर व गुन्हेगारी स्वरूपाचा विषय असताना माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने त्यांची भूमिका संशयास्पद असल्याची शंका शिक्षक भारती कडून व्यक्त केली जात आहे. शिक्षण उपसंचालक यांचे पत्र व शिक्षक भारती संघटनेची तक्रार यानुसार सचिन जगताप यांनी या शाळेकडून वस्तूनिष्ठ अहवाल मागवून घेऊन गुन्हे दाखल करण्याची कारवाई करणे अपेक्षित असताना बोगस शिक्षक व गुन्हेगारी स्वरूपाची कागदपत्रे तयार करणाऱ्या शाळा प्रशासनावर जगताप यांच्याकडून कोणतीही कारवाई झालेली नाही. याप्रकरणी लवकरच निर्णय न झाल्यास शिक्षक भारती संघटनेच्या वतीने सचिन जगताप यांच्या विरोधात बोंबाबोंब आंदोलन करणार असल्याचे सुजितकुमार काटमोरे यांनी सांगितले.

**बोगस मान्यते प्रकरणी तक्रार करून सुद्धा शिक्षण अधिकारी गुन्हेगारांना जाणीवपूर्वक पाठीशी घालत आहेत. जगताप यांची भूमिका संशयास्पद असून बोगस मान्यता प्रकरणी कारवाई न झाल्यास संघटनेच्या वतीने बोंबाबोंब आंदोलन करून जगताप यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात येईल.**

**-सुजितकुमार काटमोरे**
**जिल्हा अध्यक्ष**
**शिक्षक भारती सोलापूर**

# आधारभूत धान खरेदीची नोंदणी प्रक्रिया सेतू मार्फत करावी-विजय सिध्दावार यांची मागणी

**मूल । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हयात आधारभूत धान खरेदीकरीता आपले प्रयत्नातून नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. ही नोंदणी कृषी उत्पन्न बाजार समितीसोबतच सेतू केंद्रातूनही करावी अशी मागणी मूल सोशल फोरमचे संयोजक विजय सिध्दावार यांनी केली. ही मागणी त्यांनी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचेकडे केली आहे.

मूल येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत सुरू असलेल्या आधारभूत धान खरेदीच्या नोंदणी प्रक्रियेत सहभागी होवू इच्छिणार्या शेतकर्यांना प्रचंड मानसिक, शारीरीक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्यांचा शेतकर्यांचा आरोप आहे. पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मूलसह आणखी दोन नोंदणी केंद्र सुरू करण्याबाबत जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना निर्देश दिले असले तरी, अजूनही ते केंद्र सुरू नसल्यांने, मूल येथेच शेतकर्यांनी गर्दी केली आहे. पहाटे पाच वाजेपासूनच शेतकरी नोंदणी करीता आवश्यक कागदपत्रे घेवून लाईनीत लागत आहेत. मात्र अनेकांची नोंदणी होत नसल्यांने या शेतकर्यांना परत पावली फिरावे





लागत आहे. काही शेतकरी तर तीन तीन दिवसापासून चकरा मारूनही, नोंदणी होत नसल्यांने संताप व्यक्त करीत आहे. सध्या थंडीचे दिवस असल्यांने, पहाटे आणि सायंकाळी उशीरापर्यंत या शेतकर्यांना थंडीत कुडकुडत नोंदणीसाठी नावाचा पुकारा होईल या आशेवर खुल्या जागेत बसून असल्यांचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे या शेतकर्यांना वृध्द महिला शेतकर्यांचाही समावेश आहे. बाजार समितीत नोदणी करण्याकरीता, आवश्यक पुरेसे मणुष्यबळ व संसाधने नसल्यांने अतिशय संथ गतीने ही नोंदणी होत आहे. अनेक बाजार समितीवर काँग्रेस विचारांचे संचालक मंडळ असल्यांने व आधारभूत धान खरेदीची योजना ही महायुती सरकारची असल्यांने, या संचालकांकडूनही जाणीवपूर्वक दिरंगाई केली जात आहे. मागील वर्षीही अशाच संथ गतीने नोंदणी केल्यांने, अनेक शेतकर्यांना नोंदणी करता आली नव्हती व त्यामुळे नोंदणीची मुदत शासनाला वारंवार वाढवून द्यावी लागली होती. यावर्षीही अशीच परिस्थिती होण्यांची भिती आहे. सेतू केंद्रातून आधारभूत धान खरेदीची नोंदणी केल्यास,गावातच शेतकर्यांना नोंदणी करता येईल, बाजार समितीच्या ठिकाणी येवून, प्रसंगी मुक्काम करून, नोंदणी करण्यांकरीता शेतकर्यांना शारीरीक, आर्थिक व मानसिक त्रास होणार नाही, सेतू केंद्र चालकांना यातून थोडाफार रोजगार उपलब्ध होईल, बाजार समिती संचालकांची मनमानी थांबेल, मुदतील सर्व शेतकर्यांची नोंदणी होवून वारंवार मुदतवाढ देण्याची गरज भासणार नाही, सेतु मार्फतीचे केलेली नोंदणीही अखेर शासनाच्या संबधीत पोर्टलवरच जाईल. सेतू केंद्रामार्फत धान उत्पादकांची नोंदणी केल्यास वारंवार नोंदणीची मुदतवाढ करण्यांचीही गरज राहणार नाही याकडे विजय सिध्दावार यांनी पालकमंत्री मुनगंटीवार यांचे लक्ष वेधले आहे.

# शेतकऱ्यांच्या समृद्धीचा महामार्ग खुला करणारा देवदैठण ढवळगाव येवती शिवरस्ता अखेर खुला

**पारनेर । प्रतिनिधी**

शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने श्रीगोंदा महसूल,पोलीस प्रशासन,भूमी अभिलेखचे आभार खुल्या होणाऱ्या शेतरस्त्यांच्या नंबरींचे संरक्षण करण्याची जबाबदारी शेतकऱ्यांची श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव ,येवती, शिवरस्ता खुला करण्यात आला असून हा प्रश्न मार्गी लागल्यामुळे शेतकऱ्यांच्या समृद्धीचा महामार्ग खुला होत असल्याचे महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी प्रशासनाचे आभार मानले.सदर रस्ता खुला करण्यासाठी सरपंच जयश्री विश्वास गुंजाळ यांनी तहसीलदारांकडे अर्ज दाखल केला होता श्रीगोंदा तालुक्यात प्रलंबित शेतरस्ता केसेस संदर्भात श्रीगोंदा शिव पानंद शेत रस्ता कृती समितीच्या माध्यमातून सदर रस्त्यांच्या प्रश्नांवर शरद पवळे व दादासाहेब जंगले यांच्या नेतृत्वाखाली राजेंद्र नागवडे,ड. गोरख



कडूस पाटील,अविनाश भवर, राम अडसरे गुरुजी,परेशभाई वाबळे,सुनील गायकवाड,गुरु गायकवाड,जालिंदर कातोरे,बापूराव जंगले,किरण कुरुमकर, यांनी वेळोवेळी आंदोलन करत प्रशासनाला कार्यवाही करण्यास भाग पाडले सदर रस्त्याच्या मोजणीसाठी भू कर मापक अजिंक्य औताडे यांनी हद्द निश्चित करून दिली ,त्यानंतर महसूल विभाग देवदैठण मंडळ अधिकारी गिरीश गायकवाड,महसूल अधिकारी संगीता मगर ,ग्राम महमूल विभाग अधिकारी येवती,ढवळगाव, ग्रामविकास अधिकारी विजय मोरे यांनी रस्ता खुला करण्यासाठी काम सुरू केले आहे .देवदैठण, येवती ढवळगाव शिव रस्ता एक ते दीड किलोमीटर अंतराचा आहे यावेळी देवदैठण तंटामुक्ती अध्यक्ष राजेंद्र कौठाळे,वसंत बनकर ,काशिनाथ कौठाळे,विश्वास गुंजाळ ,रवींद्र शिंदे ,बबन शिंदे, रूपाली दिवटे, विलास दिवटे ,ग्रामविकास अधिकारी दिलीप रासकर ,सुरेश इगावे, बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मारुती कोळपे ,पोलीस नाईक शरद गांगर्डे ,पोलीस कॉन्स्टेबल उत्तम राऊत, कविता माने ,महसूल सेवक अकबर शेख ,लिंबराज ,विशाल भवर,लक्ष्मण भवर,अमोल भवर,

मेजर संतोष शिंदे, फंड,आदींचे बहुतांश शेतकरी उपस्थित होते अनेक वर्षानंतर हा रस्ता खुला झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले त्याचबरोबर महाराष्ट्र चळवळीचे शरद पवळे व दादासाहेब जंगलेपाटील यांनी श्रीगोंदा तहसिलदार डॉ. क्षितिजा वाघमारे व देवदैठण ग्रामस्थांचे विशेष आभार मानत इतर गावांनी याचा आदर्श घ्यावा असे यावेळी मत चळवळीच्या वतीने व्यक्त करण्यात आले.

# 'प्रवरा'च्या माध्यमातून न्याय दिला जाईल आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे शेतकऱ्यांना आश्वासन

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यात ऊस तोडीबाबत शेतकऱ्यांना अडचण निर्माण झाल्यास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सहकार्याने प्रवरा कारखान्याच्या माध्यमातून न्याय दिला जाईल, असा विश्वास जिल्हा बँकेचे चेअरमन, आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी व्यक्त केला आहे.

राहुरी विधानसभा मतदार संघाची निवडणूक पार पडली. यावेळी प्रचारात सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांच्या ऊस तोडीसाठी टाळाटाळ करण्याचा प्रकार काही ठिकाणी सुरू झाल्याची माहिती समजली आहे, असे सांगत, याप्रश्नावर बोलताना आमदार कर्डिले म्हणाले की, तालुक्यातील शेतकऱ्यांनी ऊसतोडीबाबत काळजी करू नये. वेळेपूर्वी ऊस तोडण्याची घाई करू नये.

ऊस तोडीबाबत अडचण निर्माण झाल्यास तत्काळ माझ्याशी संपर्क साधावा. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सहकायनि प्रवरा साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस तोड करण्यासाठी न्याय दिला जाईल. निवडणूक



ठराविक काळापूर्ती असते. यामध्ये लोकशाही मार्गाने मतदारांसह सभासद कार्यकर्ते भूमिका घेतात.

निवडणूक संपल्यानंतर राजकारण बाजूला ठेवून काम करणे महत्त्वाचे असते, परंतू काही ठिकाणी केवळ राजकारणाला महत्त्व दिले जाते. यामुळे काही अंशी प्रामाणिक शेतकऱ्यांवर अन्याय होऊ शकतो असे सांगत, शेतकऱ्यांनी काळजी न करता ऊस तोडीबाबत समस्या असल्यास संपर्क साधावा. न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, असे आमदार कर्डिले यांनी स्पष्ट केले आहे.

# अहिल्यानगर येथे सैन्य अग्निवीर भरती मेळाव्याचे आयोजन



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

यांत्रिकी पायदळ केंद्र आणि शाळा, (पंकज जोशी स्टेडियम) अहिल्यानगर येथे १४ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत पुरुष आणि महिलाकरीता सैन्य अग्निवीर भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

या मेळाव्याअंतर्गत अहिल्यानगर , बीड, लातूर, धाराशिव, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील निवड झालेल्या पुरुष उमेदवाराकरीता मुख्यालय रिक्रूटिंग झोन, पुणे यांच्या अंतर्गत अग्निवीर भरती मेळावा महाराष्ट्र आणि गुजरात, गोवा दमण, दीव आणि दादर, नगर हवेली केंद्रशासित प्रदेश या राज्यांतील निवड झालेल्या सुमारे ७ हजार उमेदवारांची शारीरिक चाचणी आणि वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे.तरी पात्र उमेदवारांनी अहिल्यानगर येथे उपस्थित रहावे, असे आवाहनजिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल हंगे स. दै. (नि.) यांनी केले आहे.

# सिन्नर शिर्डी राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात;खाजगी बस आणि ट्रॅक्टरची धडक

**शिर्डी । प्रतिनिधी**

सिन्नर-शिर्डी राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी सायंकाळी सातवाजेच्या सुमारास पाथरे गावाजवळ खाजगी आराम बस आणि ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टरची समोरासमोर धडक होऊन अपघात झाला. या अपघातात एक जण मयत झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत. या भीषण अपघातामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिर्डी येथून सुरतच्या दिशेने जाणारी खाजगी बस एम पी ४५ झेड ई ४४९९ पाथरे येथील साई भक्त निवास समोर आली. तेव्हा विरुद्ध बाजूने समोरून येणाऱ्या ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर धडकली. विरुद्ध बाजूने हा ट्रॅक्टर येत असल्याने बस चालकाला अंदाज आला नाही. या अपघातात बसच्या दर्शनी भागाचे मोठे नुकसान झाले. बसचा कंडक्टर तसेच ट्रॅक्टर सोबत असणारे दोघेजण रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. अपघाताची माहिती समजल्यावर वावीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह धाव घेतली. पाथरे परिसरातील तरुणांनी मदतीसाठी पुढाकार घेतला. सर्व जखमींना पिंपरवाडी तोल प्लाझा येथील रुग्णवाहिकेतून कोपरगावच्या संत जनार्दन स्वामी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात



आले.

तेथे एकाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. ही मृत व्यक्ती ट्रॅक्टरसोबत होती. बसचा कंडक्टर आणि ट्रॅक्टरवर असलेल्या आणखी एका व्यक्तीवर उपचार सुरू करण्यात आले आहेत. हा ट्रॅक्टर ऊस तोडणी कामावरील असल्याची चर्चा आहे. मात्र हा ट्रॅक्टर नवीन असून पासिंग झाला नसल्याचे सांगण्यात आले.विरुद्ध दिशेने हा ट्रॅक्टर पाथरे गावाच्या दिशेने जात होता. ट्रॅक्टरसोबत जोडलेल्या ट्रॉलीत ऊस भरलेला होता. ट्रॅक्टर सोबत असलेला मृत आणि जखमी व्यक्ती जळगाव जिल्ह्यातील पाचोरा परिसरातील असल्याचे सांगण्यात आले. मात्र त्यांची कोणतीही ओळख पटवता आली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

# शरद पवार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

पुण्यातीलसरहद संस्था आयोजित अखिल भारतीय साहित्य



महामंडळाचे ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २१ ते २३फेब्रुवारी २०२५ या काळात दिल्लीला होणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार हेया संमेलनाच्या स्वागताध्यक्ष असणार आहेत.

जवळपास ७० वर्षांनी पुन्हा एकदा दिल्लीला मराठी साहित्य संमेलन होत आहे. दिल्ली ही देशाची राजकीय राजधानी असल्यामूळे येथे होणारे संमेलन सर्वसमावेशक व्हावे, या भावनेतून संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी अनुभवी, ज्येष्ठ व साहित्यरसिक व्यक्ती व्हावी असा संयोजक समितीने प्रयत्न केला. त्यातून शरद पवार यांनी स्वागताध्यक्ष व्हावे, अशी संस्थेने विनंती केली आणि ती त्यांनी मान्य केल्याची माहिती सरहद संस्थेचे संजय नहार, डॉ. शैलेश पगारिया, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मिलिंद जोशी आणि सुनीता राजे पवार तसेच संयोजन समितीचे डॉ. सतीश देसाई यांनी पत्रकार परिषदेत दिली.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी या नेत्यांनाही संमेलनासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

# डॉ.बाबुराव उपाध्ये यांची पुस्तके भक्ती व नीतीचे संस्कार देतात : मीराताई बागूल

**श्रीरामपूर । अतुल देसर्डा**

माझे भाऊदादा प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये यांची सर्व पुस्तके मी वाचली असून आमच्या घरात आणि परिवारात त्यांच्या पुस्तकांचे मनापासून वाचन करतो. त्यांची पुस्तके भक्ती व नीतीचे संस्कार देतात, त्यामुळे आमच्या व नातेवाईकांच्या घरातील लहानापासून थोरापर्यंत सर्वजण सदैव उत्तम नागरिक म्हणून वागतात, असे उत्स्फूर्त विचार ओझर येथील कुंभार समाजाच्या कार्यकर्त्या मीराताई बागूल यांनी व्यक्त केले. श्रीरामपूर येथील ग्रंथालय वाचनालयातील विविध ग्रंथ पाहताना, वाचताना त्यांनी आनंद व्यक्त केला. वाचन संस्कृती प्रतिष्ठानची वाचन चळवळ गावोगावी, घरीदारी आणि कुटुंबाकुटुंबात सुरू केल्याबद्दल मीराताई बागूल यांनी मंदाकिनी उपाध्ये, गणेशानंद



उपाध्ये, आरती उपाध्ये यांचे कौतुक करून डॉ. उपाध्येसह सर्वांचा सन्मान केला. यावेळी ओझर येथील व्यापारी दुकानदार व कुंभार समाजाचे कार्यकर्ते अशोकराव बागूल, कोपरगाव येथील वीट कारखानदार बाळासाहेब उपाध्ये यांनीही वाचन संस्कृती चळवळीचे कौतुक केले. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी स्वागत, प्रास्ताविक करून विविध पुस्तके देऊन सन्मान केला. यावेळी स्व. संतराम त्रिंबक सैंदोरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. सौ. मीराताई बागूल यांनी डॉ. बाबुराव उपाध्ये यांच्या १९९५ च्या पहिल्या कवितासंग्रह 'निवडुंगाची फुलं' पासून नुकतेच प्रकाशित झालेल्या 'दिव्यत्वाचे चिंतन', 'साहित्याचे नंदादीप' अशा ५१ पुस्तकांच्या निर्मितीबद्दल कौतुक केले. 'भारतीय कुंभार समाजातील संत' या पुस्तकाचे विशेष कौतुक केले.श्रीरामपूर शहरात असे साहित्यिक राहतात, कुंभार समाजातील अशा साहित्यिकांचा सार्थ अभिमान वाटतो, असे सांगून नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातील भारम-कोळम हे डॉ. उपाध्ये यांचे मूळ गाव आहे. त्यांचे बालपण व प्राथमिक शिक्षण श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथे झाले, तर उच्च शिक्षण श्रीरामपूरमध्ये झाले. बालपणापासून वाचन, लेखन करणारे डॉ. उपाध्ये यांचा आम्हाला सार्थ गौरव वाटतो, असे विचार सौ. मीराताई बागूल यांनी व्यक्त केले. आरती उपाध्ये यांनी आभार मानले.

# सर्व बातम्या निराधार,मी सत्तेत कोणत्याही मंत्रिपदाच्या शर्यतीत नाही-श्रीकांत शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून माघार घेतली आहे. त्याबदल्यात शिवसेनेला उपमुख्यमंत्री पद मिळणार असून त्यासाठी श्रीकांत शिंदे यांच्या नावाची चर्चा रंगली होती. यावर खुद्द श्रीकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या उपमुख्यमंत्री पदाबाबतच्या सर्व बातम्या निराधार आणि बिनबुडाच्या आहेत. त्यात कोणतेही तथ्य नाही, असे श्रीकांत शिंदे यांनी सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत सांगितले. श्रीकांत शिंदे यांच्या स्पष्टीकरणामुळे त्यांच्या उपमुख्यमंत्री पदाबाबतच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.महायुतीच्या सरकारचा शपथविधी थोडा लांबल्यामुळे सध्या चर्चा आणि अफवा यांचे पीक फोफावले आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे दोन दिवस गावी जाऊन विश्रांती घेतली. त्यामुळे अफवांना अधिकच बहर आला. मी उपमुख्यमंत्री होणार अशा बातम्या प्रश्नचिन्हे टाकून गेले दोन दिवस दिल्या जात आहेत. वस्तूतः यात कोणतेही तथ्य नसून माझ्या उपमुख्यमंत्री पदाबाबतच्या सर्व बातम्या निराधार आणि बिनबुडाच्या आहेत, असे स्पष्टीकरण एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिले.श्रीकांत शिंदे यांनी केंद्रीय पदाबाबतही भाष्य केले. लोकसभा निवडणुकीनंतरही मला केंद्र सरकारमध्ये मंत्रिपदाची संधी होती. मात्र पक्षसंघटनेसाठी काम करण्याचा विचार करून मी तेव्हाही मंत्रिपदाला नकार दिला होता. सत्तेतल्या पदाची मला कुठलीही लालसा नाही. राज्यातील सत्तेत कोणत्याही मंत्रिपदाच्या शर्यतीत मी नाही, हे पुन्हा एकदा स्पष्ट करतो. माझा लोकसभा मतदारसंघ आणि शिवसेना या पक्षासाठीच नेटाने काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.माध्यमांचा उत्साह आणि स्पर्धा आम्ही समजू शकतो, परंतु बातम्या देतांना त्यांनी वास्तवाकडे पाठ फिरवू नये अशी माझी विनंती आहे. माझ्यासंदर्भातल्या चर्चांना आता तरी पूर्णविराम मिळेल अशी माफक अपेक्षा आहे, असे म्हणत श्रीकांत शिंदे यांनी माध्यमांचे कान टोचले.

# विवेकानंद महाविद्यालयात डॉ.विजय टोंगे यांना निरोप

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील वाणिज्य विभागप्रमुख डॉ. विजय टोंगे यांना सेवानिवृत्ती निमित्ताने निरोप देण्यात आला. महाविद्यालयाच्या परिसरातील योगी अरविंद सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा या संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान होते. यावेळी मंचावर सत्कारमूर्ती डॉ. विजय टोंगे, त्यांच्या अर्धांगिनी अनिता टोंगे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थाध्यक्ष स्वान म्हणाले की, सेवानिवृत्ती हा प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या आयुष्यातील रुटीन भाग असतो. परंतु सेवानिवृत्ती नंतर थांबायचे नसते. सेवानिवृत्तीनंतर आयुष्याची दुसरी इनिंग सुरुवात करायची असते.आजच्या नंतर नवीन उर्जा घेऊन आपला वेळ समाजाच्या सत्कारणी लावून समाजाच्या प्रगतीसाठी हातभार लावावा. यापुढेही महाविद्यालयाला गरज पडल्यास सहकार्य करावे असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांनी गतकालीन अनेक स्मृतींना उजाळा दिला. आपल्या भाषणात प्राचार्य डॉ.नामदेव उमाटे यांनी महाविद्यालयाच्या सुरुवातीपासून सत्कारमूर्तींनी महाविद्यालयाच्या प्रगतीत डॉ टोंगे यांनी दिलेल्या योगदानाची माहिती देत महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते कसे प्रयत्नशील होते हे सांगितले. यावेळी डॉ. ज्योती राखुंडे, डॉ. सुधीर आस्टुनकर, डॉ. रमेश पारेलवार, डॉ.जयवंत काकडे, प्रा. धनंजय बेलगांवकर ,प्रा. श्रीकांत दाते, प्रा. रामकृष्ण मालेकर, वामन अंड्रसकर यांच्यासह अनेक सहकाऱ्यांनी आपल्या जुन्या आठवणी जाग्या केल्या. यावेळी संस्थाध्यक्ष श्री.स्वान याच्या हस्ते विवेकानंद ज्ञानपीठाच्या वतीने टोंगे दाम्पत्याला भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य उमाटे टोंगे दाम्पत्याला भेटवस्तू दिल्या. महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी सामूहिक भेटवस्तू दिल्या. यावेळी महाविद्यालयातील सेवानिवृत्त लिपिक श्री. रमण मुळे यांनाही संस्थेच्या वतीने भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. विवेकानंद संगीत कला अकादमीचे अमित लभाणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुरेल आवाजात निरोप गीते गावून उपस्थितांना रिझवले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गजानन खामनकर, संचालन सुरभी भागडे, आभार प्रदर्शन दीपक तेलंग यांनी मानले.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. यावेळी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक तथा शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# आनंद निकेतन महाविद्यालयाच्या खेळाडूंना राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत कास्य पदक

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन विद्यालयाच्या दक्षता मिलमिले व प्रणय चंद्रभान खेरे यांनी जिल्हा क्रीडा संकुल, अकोला येथे २६ ते २८ नोव्हेंबर २०२४ दरम्यान झालेल्या शालेय राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करत कास्य पदक जिंकले. दोन्ही खेळाडूंनी १९ वर्षांखालील वयोगटात आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करून हा यशस्वी प्रवास पूर्ण केला.

खेळाडूंनी जिद्द व चिकाटीने मेहनत करत हा विजय संपादन केला. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी प्रशिक्षक पंकज शेंडे आणि मार्गदर्शक प्रा. तानाजी बायस्कर यांना दिले आहे. महारोगी सेवा समिती वरोरा चे सचिव डॉ. विकास आमटे, विश्वस्त कौस्तुभ आमटे, अंतर्गत व्यवस्थापक सौ. पल्लवी आमटे, आनंद निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे, उपप्राचार्य प्रा. राधा सवाने, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. तानाजी बायस्कर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# श्री ढोकेश्वर कॉलेजच्या संघाने पटकावला सेनापती बापट नाट्य करंडक

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील न्यू आर्टस्, कॉमर्स सायन्स कॉलेज, पारनेर आणि टीम आडवाटेचं पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर महाविद्यालयात तिसऱ्या सेनापती बापट नाट्य करंडकाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयीन गटातून श्री ढोकेश्वर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना अशा दोन संघानी सहभाग घेतला.राष्ट्रीय छात्र सेनेच्या संघाने सोशल मीडियाचा अतिवापर या विषयावर नाट्य सादर करून तृतीय क्रमांक पटकावला, तर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संघाने लोकशाहीतील कढीपत्ता – कार्यकर्ता या विषयावरील नाट्य सादर करून प्रथम क्रमांक पटकावत मानाचा सेनापती बापट नाट्य करंडक पटकावला. सेनापती बापट नाट्य करंडक स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते. या स्पर्धेत माध्यमिक विद्यालये व महाविद्यालये मिळून जवळपास २० पेक्षा अधिक संघानी सहभाग घेतला. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना संघासाठी प्रा. संकेत ठाणगे यांना उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून गौरवण्यात आले. या विद्यार्थ्यांना प्रा. नामदेव वाल्हेकर, प्रा. शांता गडगे, प्रा. संकेत ठाणगे यांनी मार्गदर्शन केले तर प्राचार्य आर.के. आहेर यांनी स्वतः दोन्ही संघांच्या तयारीचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले.



## शुगरकेन ब्रीडिंग इन्स्टिट्यूट, कोइम्बतूर व ऊस संशोधन केंद्र पाडेगाव येथील

# शास्त्रज्ञांची सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखान्यास भेट

**कोपरगाव । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना येथे दरवर्षी ऊस संशोधनासंदर्भांत केंद्रिय पातळीवरील अग्रगन्य ऊस संशोधन संस्था शुगरकेन ब्रीडिंग इन्स्टिट्यूट, कोइम्बतूर यांच्या तसेच राज्य पातळीवर ऊस संशोधन केंद्र पाडेगाव यांच्या ऊसपिकाचे नविन वाण संशोधनासंदर्भात चाचण्या चालू असतात. १९८० साली संजीवनी सहकारी साखर कारखाना लि., यांचे प्रक्षेत्रावर को ७२१९ या ऊस जातीचे संशोधन होऊन को ७२१९ ऊस जातीस संजीवनी हे नाव देण्यात आले होते., वरील ऊस संशोधन चाचण्या बघणेकामी कोइम्बतूर येथील प्रमुख ऊस शास्त्रज्ञ डॉ. अण्णा दुराई, डॉ. विक्रांत सिंग, डॉ. ज्योती रेखा पटनायक व ऊस रोग शास्त्रज्ञ (VSI) डॉ. आर. एस यादव यांनी भेट दिली. त्यांचे बरोबर ऊस संशोधन केंद्र पाडेगाव येथील ऊस शास्त्रज्ञ डॉ. उबाळे व डॉ. गांगुर्डे हे देखील उपस्थित होते.यावेळी सजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष श्री. बिपिनदादा कोल्हे सो. व कारखान्याचे अध्यक्ष श्री. विवेक कोल्हे तसेच मॅनेजिंग डायरेक्टर श्री बाजीराव जी. सुतार यांचेशी बोलताना शास्त्रज्ञ म्हणाले की, संजीवनाच्या कार्यक्षेत्रातील जमीन, पाणी व वातावरणात जास्त ऊस व साखरेचे उत्पादन देणाऱ्या ऊस जातीची पैदास करण्यासाठी या चाचण्यांचा निश्चित उपयोग होईल. त्याकामी कोइम्बतूर व पाडेगाव येथील ऊस संशोधन संस्थांचा या कामी कायमच सहकार्य राहील असे ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव चे शास्त्रज्ञ डॉ. उबाळे म्हणाले.तसेच कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना ऊस किडरोग नियंत्रण व ऊस पिक सिंचन याकामी मार्गदर्शन केले जाईल असे त्यांनी सांगितले.याकरीता कार्यक्षेत्रातील जमिनीचे माती पाणी परीक्षण रिपोर्ट कोइम्बतूर व पाडेगाव येथील शास्त्रज्ञांना देण्यात यावे व त्यानुसार ऊस पिक जोपासनेचे मार्गदर्शन घ्यावे असे निर्देश कारखान्याचे अध्यक्ष श्री. विवेक कोल्हे यांनी दिले. यावेळी आलेल्या सर्व शास्त्रज्ञांचा सत्कार कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. बाजीराव जी. सुतार याचे हस्ते करण्यात आला. कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. शिवाजीराव दिवटे, केन मॅनेजर श्री. जी. बी. शिदे, ऊस विकास अधिकारी श्री. शिवाजीराव देवकर व त्यांचे सर्व सहकारी यावेळी उपस्थित होते.




# साई मंदिर,पूर्णवादनगर, श्रीरामपूर येथे श्री साई सच्चरित ग्रंथ पारायण सोहळ्यास सुरुवात



**श्रीरामपूर । अतुल देसरडा**

पूर्णवादनगर साई भक्तांच्या वतीने तसेच स्व. राजाभाऊ चांडवले यांच्या स्मरणार्थ आयोजित श्री साई सच्चरित ग्रंथ पारायण सोहळ्यास कु. अनुराधा पुष्पलता गोविंदराव आदिकमा. विश्वस्त – श्री. साईबाबा संस्थान, शिर्डी.,मा. लोकनियुक्त नगराध्यक्षा – श्रीरामपूर नगरपरिषद अध्यक्षा – महाराष्ट्र कृषक या उपस्थित होत्या त्यांनी समाजग्रंथाचे वाचन केले व सद्गुरू साईनाथ महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. याप्रसंगी शैलजाताई अकोलकर,शैलाताई बोरावके,सुदेशनाताई चांडवले,सारिकाताई चांडवले,वैशालीताई चांडवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अभिजित लिप्टे, तुषार चांडवले, गोपाल वायदेशकर, रंजन व्हावळ व ग्रंथ वाचक महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## माळी बाभूळगावातील शेतकऱ्यांची चिंता

# सिताफळाच्या बागेवर लाखोंचा खर्च तरीही मिळत नाही अपेक्षित बाजारभाव!

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील माळी बाभूळगावातील प्रगतशील शेतकरी बाजीराव किसन वाळके आणि अशोक किसन वाळके यांच्या छचघ गोल्डन जातीच्या सिताफळाच्या बागेला दोन वर्षांपासून सुरु असलेल्या मेहनतीला बाजारभावाची कडवट चव लागली आहे. सुमारे तीन एकर क्षेत्रात तयार झालेल्या या बागेवर शेतकऱ्यांनी लाखोंचा खर्च केला आहे. मात्र, बाजारात त्यांना त्याच्याप्रमाणे योग्य दर मिळत नाहीत, ज्यामुळे त्यांची चिंता आणि आर्थिक तणाव शिगेला पोहोचला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून बागेवर घेतलेल्या कष्टांमध्ये श्रम आणि गुंतवणुकीची उंची वाढली आहे. उत्पादनाच्या प्रमाणात भरभराटीची शक्यता असतानाही, बाजारात अनिश्चिततेचे वारे वाहत आहेत. बाजीराव वाळके यांचे म्हणणे आहे, आम्ही खूप मेहनत घेतली आहे, पण बाजारभाव त्याच्या उलट आहे. आता कुटुंबासाठी आणि या शेतीसाठी काय करावं, तेच समजत नाही!शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात घेतल्यास, फळांच्या योग्य भावाचे महत्त्व अत्यंत आहे. त्यांना त्यांच्या कष्टाचे योग्य फळ मिळण्यासाठी सरकार आणि व्यापारी संस्थांनी उपाययोजना करणे अत्यावश्यक ठरते. जर यावर ठोस पाऊले उचलली गेली नाहीत, तर शेतकऱ्यांचा संघर्ष अधिक गडद होईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबाचीही स्थिती गंभीर बनली आहे. बाजारभावातील असमानता आणि अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाला धक्का बसला आहे. अशा परिस्थितीत, योग्य बाजारभाव आणि समर्थनाच्या अभावी शेतकरी अजूनही संकटात आहेत, ज्यामुळे त्यांच्या भविष्यातील जोखीम वाढली आहे.



## राहुल जगताप 'दादां'च्या गोटात

# मुंबईत अजित पवार यांची भेट घेऊन चर्चा

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत बंडखोरी केलेले माजी आमदार राहुल जगताप यांनी सोमवारी (ता.२) मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांची भेट घेतली. दरम्यान, कुकडी साखर कारखान्यापुढील अडचणी सोडवण्यासाठी सत्तापक्षात जाणे गरजेचे असल्याने जगताप समर्थकांचा एक गट आग्रही आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर माजी आमदार राहुल जगताप यांनी खासदार शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या आधिपत्याखालील कुकडी सहकारी साखर कारखाना अडचणीत असतानाही व लोकसभा निवडणुकीत मोठा दबाव येऊनही ते शरद पवारांशी एकनिष्ठ राहिले.मात्र, विधानसभा निवडणुकीत श्रीगोंद्याची राष्ट्रवादीची जागा ऐनवेळी शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) वाट्याला गेल्याने जगताप यांची गोची झाली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्याने जगताप यांनी अपक्ष उमेदवारी केली. एकाकी झुंज देत दुसऱ्या क्रमांकाची ६२ हजार ६६४ मते मिळवली.

महायुतीचे सरकार येणार आहे. शिवाय, जगताप यांचा कुकडी कारखाना आर्थिक अडचणीत आहे. कारखान्यापुढील अडचणी सोडवण्यासाठी व पुढील राजकारणाला ''ताकद'' मिळवण्यासाठी अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीत जाण्यासाठी एक गट आग्रही आहे.दरम्यान, याबाबत माजी आमदार राहुल जगताप यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.जगताप यांनी अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीचा अधिक तपशील समजू शकला नाही. मात्र, सरकार स्थापनेनंतर जगताप राष्ट्रवादीत प्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.





सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# एड्स जागरूकता कार्यक्रम संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती द्वारा संचालित यशवंतराव शिंदे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चिचोर्डी, भद्रावती येथे जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम दि ३ डिसेंबर २०२४ ला आयोजित करण्यात आला. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ सुधीर मोते यांनी चुकीच्या समजतीमुळे या आजारातीला रूग्णाला समाजातील लोक बहिष्कृत करतात असे मार्गदर्शन केले. यशवंतराव शिंदे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चिचोर्डी भद्रावती येथे जागतिक एड्स दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ सुधीर मोते, प्रमुख मार्गदर्शक शितल भाडके, ग्रामीण रुग्णालय भद्रावती, प्रमुख अतिथी पुनम चुनारकर, निशा वखनोर विहाण चंद्रपूर तसेच दर्शना मून संबोधन ट्रस्ट चंद्रपूर हे व्यासपीठावर उपस्थित होते. आजच्या चंगळवादी, धकाधकीच्या जीवनात विविध आजारांनी थैमान घातले असताना एड्स हा आजार आज मोठ्या प्रमाणात फोफावत आहे. याबद्दलचे योग्य ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे, विद्यार्थ्यांनी गैरसमजुती तून मुक्त व्हावे यासाठी जागतिक एड्स दिनानिमित्त जागृकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून शितल भटके यांनी या आजारासंबंधीची विस्तृत अशी माहिती दिली. त्याची कारणे, उपाययोजना याबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी काही वैयक्तिक वैद्यकीय समस्या असल्यास ग्रामीण रुग्णालय भद्रावती येथील २१ क्रमांकाचे रूममध्ये यावे व समुपदेशन करून घ्यावे असेही मार्गदर्शन केले. तसेच समग्र विहान काळजी व आधार केंद्र चंद्रपूरच्या पुनम चुरारकर, निशा वखनोर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई द्वारा संचालित संबोधन ट्रस्ट चंद्रपूर च्या दर्शना मून मॅडम यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या समस्यांचे निराकरण केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ ज्ञानेश हटवार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. किशोर ढोक यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रा. उज्वला वानखेडे, प्रेमा पोटदुखे, संगीता जक्कुलवार, माधव केंद्रे, कमलाकर हवाईकर, डॉ प्रशांत पाठक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला समस्त प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पत्रकारांच्या भावना दुखावणे हेतू नव्हता, दिलगीर आहे-खा.बजरंग सोनवणे

**केज । प्रतिनिधी**



आ. संदीप क्षीरसागर यांच्या नागरी सत्कार प्रसंगी मनोगत व्यक्त करताना अनावधानाने आपले बाबत संशय निर्माण करणारी बातमी कुणाला संशय आला म्हणून केल्याचे आपण म्हटले. यावेळी आपण केज मतदारसंघात जीवाचे रान करत प्रचार केला व प्रचार यंत्रणा सांभाळली असताना माझ्या भूमिकेवर संशय निर्माण करणारी बातमी देखील माझ्या सारख्या कार्यकर्त्यास मनस्ताप देणारी ठरली.

यातून सदरील पत्रकार मित्राकडे तक्रार वजा बोलताना संशय आपणास का घरच्या कुणाला आला? असे म्हटले गेले. यावेळी उल्लेख केलेल्या शब्दांनी कुणाच्या भावना दुखाव्यात अशी आपली अजिबात इच्छा नव्हती. मात्र याने माझ्या राजकीय प्रवासात माझ्या सोबत कायम राहिलेल्या अनेक सहकारी मित्रांचे मन दुखावले. अशा सर्व माझ्या मित्राकडे मी दिलगिरी व्यक्त करतो. माझ्या पत्रकार मित्रांना दिलगिरी सोबतच हे आवाहन करतो की, आपण माझे टिकाकार सल्लागार आहात, मी टिकेचे आणि सल्ल्याचे नेहमी स्वागत करत आलोय, पुढेही करणारच आहे. मात्र, आपल्यातील निवडक मित्र ठरवून बदनामी आणि संशय निर्माण करत असतील तर आपण पत्रकार म्हणून अशा मित्रांना योग्य मार्गदर्शन करावे. मला विश्वास आहे, आज ज्या प्रमाणे माझ्याकडे आपण व्यक्त झालात, तसेच भविष्यात चुकीच्या बातमीला बंध घालाल. बाकी, मी माझ्या वक्तव्याने कुणाचे मन दुखावले हे बाबत दिलगिरी व्यक्त करत आहे, असे एका पत्रकाव्दारे प्रसिद्ध केले आहे.

# धार्मिक नगरी पुलगाव येथे देवशास्त्र गुरूंचे शुभ आगमन

**पुलगाव । प्रतिनिधी**



३ डिसेंबर २०२४ रोजी, श्री मुनिसुव्रतनाथ जिनबिंब पंचकल्याणक प्राणप्रतिष्ठा महोत्सवासाठी आचार्य श्री सुवीरसागरजी महाराज आणि त्यांच्या संघासह भगवानांच्या नूतन मुर्तींचे नगरात आगमन झाले. या महोत्सवाचा कालावधी १७ डिसेंबर ते २३ डिसेंबर आहे.

पुलगावच्या जैन समाजातर्फे आयोजित कार्यक्रमात जैन महिला लेझीम पथकाने विशेष आकर्षण निर्माण केले. मिरवणुकीची सुरुवात मदन मोहन कार्यालय येथे आचार्य श्रींच्या पूजा सोहळ्याने झाली, आणि या सोहळ्याची सांगता मिरवणुकीने केली. या दिवशी २० वा दीक्षा दिनही साजरा करण्यात आला, ज्यात स्थानिक जैन समाजाच्या मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यामुळे धार्मिक नगरी पुलगावमध्ये एक अनोखा आध्यात्मिक वातावरण निर्माण झाला, आणि त्याचा उत्साही प्रतिसाद सर्वत्र दिसून आला.

# सोलापूर रेल्वे स्थानकावर आठ दिवस प्लॅटफॉर्म तिकीट विक्री थांबवली

**माळशिरस । प्रतिनिधी**

महापरिनिर्वाण दिनानिमित्त होणारी गर्दी लक्षात घेऊन सोलापूरसह निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांची विक्री तात्पुरती थांबवण्यात आली आहे. २ ते ९ डिसेंबर या कालावधीत हा निर्णय लागू राहणार असून, प्रवाशांची सुरळीत हालचाल व गर्दी नियंत्रणासाठी हा उपक्रम राबवला जात आहे.

प्रवाशांच्या नातेवाईकांना फलाटावर प्रवेश मिळणार नसल्याने त्यांना बाहेरूनच निरोप द्यावा लागणार आहे. मात्र, ज्येष्ठ नागरिक व वैद्यकीय गरजांसाठी या नियमांत सूट देण्यात आली आहे.

सोलापूरसह छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, ठाणे, कल्याण, भुसावळ विभागातील बडनेरा, अकोला, नांदुरा, मूर्तिजापूर, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाचोरा,




चाळीसगाव, मनमाड, नाशिक, नागपूर, वर्धा व पुणे या स्थानकांवरही प्लॅटफॉर्म तिकीट विक्री थांबवली जाईल.रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना या नियमांचे पालन करून प्रवास नियोजन करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून प्रवास सुरक्षित व सुरळीत होईल.

# वैजापूर तालुक्यात सर्वाधिक मताधिक्य देणाऱ्या पालखेड गावाचा गौरव

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर गंगापूर ११२ विधानसभा मतदारसंघातील पालखेड गावाने पहिल्यांदाच इतिहास रचत नवनिर्वाचित आमदार रमेश पाटील बोरणारे यांना सर्वाधिक मताधिक्य दिल्याबद्दल गावाचा गौरव करण्यात आला.वैजापूर तालुक्यातील १६४ व गंगापूर तालुक्यातील ५३ गावांचा समावेश असलेल्या या मतदारसंघात पालखेड गावाने ११०० मताधिक्य देत आमदार रमेश पाटील बोरणारे यांना वैजापूर तालुक्यात पहिल्या क्रमांकाची लीड मिळवून दिली. या ऐतिहासिक यशामुळे पालखेड गावाचे संपूर्ण वैजापूर तालुक्यात



कौतुक होत आहे.पालखेड गावातील नागरिकांनी नवनिर्वाचित आमदार रमेश पाटील बोरणारे यांना एकजुटीने १९५३ मते दिली, ज्यामुळे त्यांना तालुक्यात सर्वाधिक लीड मिळाली. हा पराक्रम पालखेडच्या इतिहासात पहिल्यांदाच घडला असून, गावाने एकोप्याने घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद ठरला.

या ऐतिहासिक यशाच्या निमित्ताने पालखेड गावातील ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी वैजापूर येथे आमदार रमेश पाटील बोरणारे यांच्या कार्यालयात जाऊन त्यांचा सत्कार केला. या प्रसंगी गावकऱ्यांनी आमदारांसाठी संपूर्ण पाठिंबा आणि एकजुटीचे आश्वासन दिले.पालखेड गावाच्या या यशामुळे वैजापूर तालुक्यातील इतर गावांसाठी प्रेरणा निर्माण झाली आहे. रमेश पाटील बोरणारे यांना सलग दुसऱ्यांदा निवडून दिल्याबद्दल तालुक्यातील जनतेनेही अभिनंदन व्यक्त केले आहे.

# स्वच्छतेचा पुरस्कार मिळालेल्या वैजापूर शहराची कचरामय अवस्था!

**वैजापूर । प्रतिनिधी**

स्वच्छतेचा पुरस्कार पटकावलेले वैजापूर शहर सध्या कचरामय अवस्थेत असून, जागोजागी साचलेल्या कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

वैजापूर ते येवला रोडवरील विनायकराव पाटील महाविद्यालय परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा साचला आहे. या दुर्गंधीयुक्त कचऱ्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच लासुर रोड आणि गंगापूर रोडवरही कचऱ्याचे ढीग पाहायला मिळत असून, तेथील रहिवाशांना व व्यवसायिकांना त्रास होत आहे.नागरिकांनी लवकरात लवकर या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची मागणी केली आहे. स्वच्छतेच्या




पुरस्कारासाठी ओळखले जाणारे वैजापूर शहर पुन्हा एकदा स्वच्छ आणि सुंदर व्हावे, अशी स्थानिकांची अपेक्षा आहे. नगर प्रशासनाने तत्काळ पावले उचलून वैजापूर शहराची गमावलेली स्वच्छता पुन्हा मिळवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# कल्याण-मुरबाड रेल्वे मार्ग कधी साकार होणार?

**बदलापूर । प्रतिनिधी**

निसर्गसंपन्न मुरबाड तालुका गेल्या २५ वर्षांपासून कल्याण-मुरबाड रेल्वे मार्गाच्या प्रतिक्षेत आहे. प्रत्येक लोकसभा व विधानसभा निवडणुकीत या मार्गाचा विषय गाजतो, मात्र अद्यापही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. केंद्र सरकारने या प्रकल्पाला मंजुरी दिली असून, ९०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तथापि, प्रत्यक्ष प्रकल्प सुरुवातीसाठी अजूनही अनेक अडचणी कायम आहेत.

कल्याण-मुरबाड रेल्वे मार्गामुळे कल्याण आणि मुरबाड तालुक्यातील अनेक गावांमध्ये दळणवळण सुधारेल. विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना, कामगारांना व पर्यटकांना किफायतशीर प्रवासाची सुविधा मिळेल. या मार्गामुळे शहापूर तालुक्यातील काही गावांनाही लाभ होणार असून स्थानिक



अर्थव्यवस्था व रोजगाराला चालना मिळेल. या प्रकल्पासाठी १५०० कोटींच्या भूसंपादनाची गरज आहे. मात्र, जमिनीच्या मोबदल्यावरून शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. रेडीरेकनरनुसार कमी मोबदला मिळण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी कपिल पाटील यांनी दिल्लीत बैठक घेत सकारात्मक चर्चा केल्याचे सांगितले. शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही, असे त्यांनी ठामपणे जाहीर केले आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहमदनगरपर्यंत हा मार्ग विस्तारित करण्याचे आश्वासन दिले आहे. मुरबाड रेल्वे प्रकल्प वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही कपिल पाटील यांनी दिली आहे.गेल्या अनेक दशकांपासून रखडलेल्या या रेल्वे मार्गाला मंजुरी मिळाली असली तरी प्रत्यक्षात काम कधी सुरू होईल, हे अद्याप प्रश्नचिन्ह आहे. मुरबाडवासीय आणि परिसरातील नागरिक याकडे आशेने पाहत आहेत.

# विधानसभा निकालातून जनतेची भूमिका स्पष्ट;गंगापूर शहरात माजी नगराध्यक्ष संजय जाधवांचेच वर्चस्व!



प्रशांत बंब | सतीश चव्हाण | संजय जाधव | सुवर्णा जाधव

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर विधानसभा मतदारसंघात महायुतीचे आमदार प्रशांत बंब आणि महाविकास आघाडीचे उमेदवार सतीश चव्हाण यांच्यात कसोटीची लढत झाली. या लढतीत आमदार प्रशांत बंब यांनी पाच हजार १५ मतांच्या आघाडीने सलग चौथ्यांदा निवडणूक जिंकली. तथापि, गंगापूर शहरात सतीश चव्हाणांनी अधिक मतांची आघाडी घेतल्याने आगामी नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत आमदार बंब यांच्यासमोर एक मोठं आव्हान उभं ठाकलं आहे.

गंगापूर शहरात महाविकास आघाडीची प्रचाराची संपूर्ण धुरा माजी नगराध्यक्ष संजय जाधव आणि त्यांच्या पत्नी जिजाऊ महिला फाउंडेशनच्या अध्यक्षा सुवर्णा जाधव यांच्या खांद्यावर होती. यामुळे गंगापूर शहरातील आगामी निवडणुकांमध्ये महायुतीला एक चांगलीच कसरत करावी लागणार आहे. गंगापूर शहरात माजी नगराध्यक्ष संजय जाधव यांचे वर्चस्व कायम असून, त्यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीला जोरदार प्रतिसाद मिळाल्याने, आगामी काळात या क्षेत्रातील राजकीय समीकरणं उलटू शकतात.

# आ.सुरेश (अण्णा) धस यांना कॅबिनेट मंत्रीपद देऊन पक्षाने न्याय द्यावा : राजेंद्र नारायण भोंडवे

**बीड । प्रतिनिधी**

आ. सुरेश धस, ज्यांनी बीड, लातूर, धाराशिव मतदारसंघातून विधान परिषद सदस्य आणि चार वेळा विधानसभा सदस्य म्हणून पाच वेळा आमदार म्हणून निवडून येऊन आपल्या कार्यक्षमतेचा ठसा सोडला आहे, त्यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळवावे, अशी मागणी त्यांचे कट्टर समर्थक, माजी जिल्हा नियोजन सदस्य आणि गणप्रमुख राजेंद्र नारायण भोंडवे यांनी केली आहे.

आ. सुरेश धस यांचे विकासाभिमुख नेतृत्व आणि जनसंपर्काची उत्तम कुवत पाहता, त्यांना मंत्रीपद देणे हे पक्षासाठी अत्यंत फायदेशीर ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आ. सुरेश धस यांचे राजकीय प्रवास अत्यंत प्रभावी राहिला आहे. त्यांची कार्यक्षमता आष्टी विधानसभा मतदारसंघात सिंचन, वीज, दळणवळण, शिक्षण आणि औद्योगिक विकासासोबतच शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक



योजना राबविल्या आहेत. त्यांच्या कार्यामुळे बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत, आणि ग्रामविकासाच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामामुळे त्यांना विशेष ओळख मिळाली आहे. विशेष म्हणजे, कोरोनाच्या महामारीच्या काळात आ. सुरेश धस यांनी महाराष्ट्रातील सर्वाधिक कोविड सेंटर चालविले, ज्यामुळे हजारो लोकांना संकटातून वाचवले. त्यांच्या नेतृत्वाखाली, आष्टी, पाटोदा आणि शिरूर विधानसभा मतदारसंघांत भाजप महायुतीने देदीप्यमान यश मिळवले आणि सुरेश धस यांनी ८० हजारांच्या फरकाने विजय मिळवला.राजेंद्र नारायण भोंडवे यांच्या मते, आ. सुरेश धस यांना कॅबिनेट मंत्रीपद देऊन भारतीय जनता पार्टीने जनसामान्यांच्या मताचा आदर करावा आणि त्यांना बीड जिल्ह्याच्या विकासासाठी काम करण्याची संधी द्यावी. त्यांचे नेतृत्व आणि अनुभव संपूर्ण मराठवाड्यालाही फायद्याचे ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# प्रवीण बागडे यांना माफसूचा उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार प्रदान

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर तर्फे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना 'उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या वर्षी हा पुरस्कार विद्यापीठाच्या संचालक, विस्तार व शिक्षण विभागातील वरिष्ठश्रेणी लघुलेखक/स्विय सहायक प्रवीण मोरेश्वर बागडे यांना २०२३-२४ या वर्षासाठी प्रदान करण्यात आला. पुरस्कार सोहळा रजत जयंती सभागृह, पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर येथे विद्यापीठ वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात बागडे यांना पुरस्कारासोबत प्रमाणपत्र, शाल-श्रीफळ आणि मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या वर्ग १ आणि २ संवर्गातील एक शिक्षकेत्तर अधिकारी तसेच वर्ग ४ संवर्गातील कर्मचाऱ्यांना दिला जातो. पुरस्काराचे उद्दिष्ट कर्मचाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा, सेवा तत्परता आणि विद्यापीठाप्रती आत्मीयता वाढवणे आहे.

बागडे यांनी कळमेश्वर तालुक्यातील दूधबर्डी येथे २० हेक्टर शासकीय जमीन संपादित करून कृषी विज्ञान केंद्रासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यांना यापूर्वी २०१७-१८ साठी उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार आणि २०२३ मध्ये 'लम्पी योध्दा' पुरस्कार देखील प्रदान करण्यात आले होते. त्यांच्या साहित्याची आवड असून, त्यांनी कोविड काळात अनेक रुग्णांची सेवा केली आहे. तसेच त्यांच्या लेखनाची गोडी असलेल्या बागडे यांनी विविध विषयांवर २५० लेख आणि १०० मुलाखती व स्तंभ प्रकाशित केले आहेत.कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. नितीन पाटील, जैवतंत्रज्ञान विद्यापीठाचे डॉ. नियाज अहमद, वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगांवकर आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश जावळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. अजय गावंडे यांनी केले.



# कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापि सहन करणार नाहीत-अनिल जगताप

## नगर परिषदेने तात्काळ थकीत वीजबील भरून कलाकारांच्या नाट्यगृहाचा अंधार दूर करावा

**बीड । प्रतिनिधी**

कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे असून याच कलाकारांना स्वत:च्या कलेचं सादरीकरण करण्याकरिता बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह एकमेव पर्याय आहे. मात्र कलाकारांच्या या नाट्यगृहाकडे बीड नगर परिषद वारंवार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसून येते आहे. राज्य नाट्य स्पर्धा ऐन तोंडावर आलेली असताना सध्य परिस्थितीत कलाकारांचं नाट्यमंदिर अंधारात धूळ खात पडलेलं आहे. काल रोजी नाट्यगृहाचे १ लाख २० हजार रुपये थकीत वीजबील दिले नसल्याने महावितरण अधिकाऱ्यांनी नाट्यगृहाचा वीज पुरवठा बंद केला आहे. बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सौ नीतातार्इ अंधारे यांनी तात्काळ कलाकारांच्या नाट्यगृहाची वीज थकबाकी भरून नाट्यगृहातील अंधार दूर करावा. कलाकार शहराचे संस्कृतीक वैभव टिकवण्याचे काम करतात. या कलाकारांना कोणी वाली नाही असा गैरसमज मुख्याधिकारी सौ नीतातार्इ अंधारे यांनी करून घेऊ नये. कलाकारांच्या पाठीशी कायम शिवसेना मोठ्या ताकदीने उभी आहे त्यामुळे कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापि सहन करणार नाहीत. असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीतातार्इ अंधारे यांना दिला आहे.

गेल्या आठ ते नऊ महिन्यांपासून नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांचा पगार देखील नगर परिषदेने दिला नाही. गोरगरीब कर्मचारी रात्रंदिवस नाट्यगृहाची निगा राखतात, नाट्यगृहाची काळजी घेतात असे असताना जर त्यांचा महिन्यानुमहीने पगार होत नसेल तर ही बाब निष्काळजीपणाची आहे त्यामुळे मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची देखील लवकरात लवकर सोय करावी असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीतातार्इ अंधारे यांना केले आहे.



# रमाबाई आंबेडकर वार्डात भदंत सुरई ससाईंचे मार्गदर्शन; भक्तांची मोठी उपस्थिती



**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा शहरात धार्मिक उत्सवाचा माहोल निर्माण झाला आहे, कारण पूज्य भदंत नागार्जुन आर्या भंतेजी सुरई ससाई यांनी भिक्खू संघासह भंडारा शहरात आगमन केले. रमाबाई आंबेडकर वार्डमधील बुद्ध विहारास भेट देताना उपासक आणि उपासिकांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात पुष्प अर्पणाने झाली, ज्यात उपासकांनी भिक्खू संघास आणि बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांसमोर पुष्प अर्पण केले. मेणबत्त्या प्रज्वलित करताना उपस्थित सर्वांनी एकत्रितपणे बुद्धवंदना केली.

भदंत सुरई ससाई यांनी उपस्थित उपासकांना मार्गदर्शन करताना धर्माच्या मार्गावर चालण्याचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी उपस्थित उपासकांनी यथायोग्य दान दिले, ज्यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी सोनू खोब्रागडे, कैलास टेंभूर्णे, सुधिर बडोले, धमेंद्र बडोले, माधवी बन्सोड, भावना नंदेश्वर, विनय बन्सोड यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राचार्य अर्जुन गोडबोले यांनी केले, तर आभार हर्षल मेश्राम यांनी मानले.या पवित्र प्रसंगात वार्ड व परिसरातील उपासक व उपासिकांची मोठी उपस्थिती होती, ज्यामुळे भंडारा शहरात धार्मिक एकतेचा संदेश गेला.

# फडणवीस, पवार, शिंदे यांच्यात बैठक:संजय शिरसाट यांची माहिती,महायुतीच्या नेत्यांकडून शपथविधीच्या तयारीचा आढावा


**मुंबई (वृत्तसंस्था)**–एकनाथ शिंदे यांनी आज सह्याद्री अतिथीगृहावर बैठक बोलावली आहे. या बैठकीनंतर कदाचित संध्याकाळी महायुतीच्या नेत्यांमध्ये बैठक होऊ शकते, असे शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी सांगितले. महायुती सरकारचा ५ डिसेंबर रोजी सायंकाळी शपथविधी सोहळा पार पडणार आहे. आज महायुतीच्या नेत्यांची आझाद मैदानावर सोहळ्याच्या तयारीची पाहणी केली. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते. मुख्यमंत्रीपदाबाबतचा निर्णय ४ डिसेंबर रोजी जाहीर होईल, असेही त्यांनी सांगितले.

महायुती सरकारचा ५ डिसेंबर रोजी शपथविधी ठरला आहे. मात्र, अद्यापही मुख्यमंत्री कोण हे ठरले नाही. त्यातच खातेवाटपावरून एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चा आहेत. या सर्व घडामोडींवर संजय शिरसाट यांनी भाष्य केले आहे. तसेच संजय राऊत यांना एक मित्रत्वाचा सल्ला देखील दिला आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची काल तब्येत ठीक नव्हती, त्यामुळे कालच्या सर्व बैठका रद्द झाल्या होत्या. एकनाथ शिंदे यांनी आज दुपारी सह्याद्री अतिथीगृह येथे बैठकीचे आयोजन केले आहे. सह्याद्री अतिथीगृहावरील ही बैठक झाल्यानंतर कदाचित आज संध्याकाळी महायुतीचे वरिष्ठ नेते देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची बैठक होणार असल्याचे शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी सांगितले.कोण काय बोलले यावर भाष्य केले जाणार नाही. वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील, तो सर्वांना मान्य असेल, असे संजय शिरसाट म्हणाले. तर अंजल दमानिया यांच्या दाव्यावर भाष्य करणे संजय शिरसाट यांनी टाळले. कोण अंजली दमानिया? काहीही बोलणाऱ्या प्रत्येकाला आम्ही महत्व देत नाहीत, असे ते म्हणाले. पुढे बोलताना शिरसाट यांनी संजय राऊत यांना मित्रत्वाचा सल्ला दिला आहे. राऊत यांनी आता फक्त शांत रहावे. लोकांना कंटाळा येईल, इतके बोलू नका, असे शिरसाट म्हणाले.मुंबईतील आझाद मैदानावरील शपथविधीच्या तयारीचा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांकडून आढावा घेण्यात आला. महायुती सरकारच्या शपथविधीसाठी प्रदेश कार्यालयात भाजपची जय्यत तयारी सुरू आहे. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. महायुती सरकारच्या शपथविधीसाठी एनडीए शासित राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांना निमंत्रण देण्यात आले आहे. यावेळी केंद्रीय मंत्री, राज्यपाल यांच्यासह केंद्रीय पदाधिकारी, साधू महंत, कलाकार, साहित्यिक यांनाही निमंत्रित केले जाणार आहे.महाराष्ट्रातील निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबरला लागला. महायुती म्हणजेच भाजप-शिवसेना शिंदे-राष्ट्रवादी पवार यांना २३० जागांचे प्रचंड बहुमत मिळाले. मात्र १० दिवस उलटूनही मुख्यमंत्र्यांच्या नावावर निर्णय झालेला नाही. तर भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक ४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विधानभवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये होणार आहे. यामध्ये मुख्यमंत्र्यांचे नाव निश्चित होणार आहे. मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता आझाद मैदान, मुंबई येथे होणार आहे.



# आमचा स्ट्राईक रेट शिवसेनेपेक्षा चांगला, बरोबरीने खाती द्या;भुजबळ यांची मोठी मागणी

**नाशिक (वृत्तसंस्था)**– महायुतीत शिवसेनेपेक्षा राष्ट्रवादीचा स्ट्राइक रेट जास्त आहे, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. तर शिंदेंच्या शिवसेनेपेक्षा अजित पवार गटाचा स्ट्राइक रेट जास्त आहे. स्ट्राइकरेटनुसार आम्ही २ नंबरवर आहोत. महायुतीमध्ये भाजप एक नंबरवर आणि आम्ही दोन नंबरवर आहोत.



दरम्यान छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, मंत्रिमंडळात नवीन चेहऱ्यांना संधी नेहमी देण्यात येते. यावेळी जरा अडचण जास्त आहेत. दरवेळी १६० असतात. यावेळी जास्त आमदार आहेत. सर्व पक्षांमध्ये नवीन जुने चेहरे येतील, असेही त्यांनी म्हटले आहे.छगन भुजबळ म्हणाले की, प्रत्येक माजी मुख्यमंत्र्यांचा सन्मान राखला जातोच. तो शासनामध्ये असो की जनतेमध्ये सर्वच ठिकाणी त्यांचा सन्मान केला जातो. एकनाथ शिंदेंचा सन्मान राखलाच जाईल ते कुणी सांगण्याची गरज नाही. मंत्रिपदाबाबत प्रश्नावर बोलताना ते म्हणाले की, तुमच्याकडून मी ऐकतोय मला देखील काहीजणांनी नाव पाठवलेत. पण हे सगळं अंदाज आहेत. आमचे नेते अजित दादा आहेत. ते स्वतः फोन करून सांगितलं तेव्हा ते खरं आमचे प्रांत अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष दिल्लीमध्ये आहेत. त्यांना इकडे बोलावण्यापेक्षा दादा दिल्लीला गेले आहेत.

छगन भुजबळ म्हणाले की, अजित पवार यांच्यासोबत आमच्या आमदारांची जी बैठक झाली त्यात आमची चर्चा झाली की एकनाथ शिंदेंना जास्त जागा मिळाल्या त्यांचे जास्त आमदार निवडून आले. आम्हाला कमी जागा मिळाल्या अन् आमचे कमी आमदार निवडून आले. पण ज्याला स्ट्राइक रेट म्हणतात त्यात भाजप एकनंबर दोन नंबरला अजित पवारांचा गट अन् ३ नंबरला शिंदें साहेबांचा गट आहे. म्हणून त्यांच्या बरोबरीने आम्हाला मंत्रिपद देण्यात यावे अशी आमची मागणी आहे.नाशकात भुजबळांच्या कोटची चर्चा होत आहे. भुजबळांना मोठं मंत्रिपद मिळणार का? अशी चर्चा होऊ लागली आहे. छगन भुजबळ यांनी आज घातलेल्या कोटाची चर्चा होतेय. छगन भुजबळ यांनी आज घेतलेल्या कोटावर मुश्किल टिप्पणी केली आहे. मंत्रिमंडळ नाही तर नाशिकच्या थंडीमुळे कोट घातला आहे. नाशिकपासून पुढे गेल्यानंतर कोट काढून टाकणार आहे, असं भुजबळांनी म्हटलंय.

# राज्यात राष्ट्रपती राजवट का लागू केली नाही?:जितेंद्र आव्हाड

**मुंबई (वृत्तसंस्था)**–विधानसभा निवडणुकीचा निकाल १० दिवस उलटले तरी अद्याप सरकार स्थापन झाले नाही. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. २६ नोव्हेंबर २०२४ नंतर फक्त दोन दिवस तातपुरते कामकाज पाहण्याचा संबंधीत मुख्यमंत्र्यांना आणि सरकारला अधिकार असतो. त्यानंतर तात्काळ राज्यपालांनी नवीन सरकार स्थापन होईपर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवट लावणे आवश्यक होते. त्यामुळे राज्यात राष्ट्रपती राजवट का लागू केली नाही? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला. तसेच राज्यघटनेत काळजीवाहू सरकार अशी तरतूद नसल्याचेही ते म्हणाले.

जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत उपरोक्त सवाल विचारला आहे. आव्हाड म्हणाले, महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका २० नोव्हेंबर २०२४ रोजी पार पडल्या व त्याचा निकाल २३ नोव्हेंबर २०२४ रोजी लागला आहे. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला, मुख्यमंत्र्यांचा राजीनामा म्हणजे महाराष्ट्रातील राज्य सरकारची मुदत २६ नोव्हेंबर २०२४ समाप्त झाल्याचा पुरावा आहे. संविधानातील तरतुदीनुसार २६ नोव्हेंबर २०२४ आधीच नवीन सरकार स्थापन होणे आवश्यक होते.अद्याप ही सरकार स्थापन झालेले नाही. वास्तविक २६ नोव्हेंबर २०२४ नंतर फक्त दोन दिवस तातपुरते कामकाज पाहण्याचा संबंधीत मुख्यमंत्र्यांना आणि सरकारला अधिकार असतो. त्यानंतर तात्काळ राज्यपालांनी नवीन सरकार स्थापन होईपर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवट लावण्याची शिफारस करणे आवश्यक होते किंवा राष्ट्रपतींनी ती स्वत:हून लावणे आवश्यक होते. जे की कायद्याला अनुसरुन होते, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.गंभीर बाब म्हणजे भारतीय राज्य घटनेमध्ये काळजीवाहू सरकार अशी कोणतीही तरतुद अस्तित्वात नाही. तरी ही महाराष्ट्रामध्ये असंवैधानिकरित्या सरकार हाकले जात आहे. राज्याचे राज्यपाल संघ दक्ष स्वयंसेवक आहेत. तीच गत निवडणुक आयोगाची आणि राष्ट्रपती पदावर बसवलेल्या व्यक्तीची झाली असल्याची टीका आव्हाड यांनी केली.

लहान मुलांच्या बाहुला-बाहुलीच्या खेळात सुद्धा एकप्रकारचा निरागस प्रामाणिकपणा असतो. परंतु, ज्याच्या हाती ससा तो पारधी या न्यायाने भाजपाने संपूर्ण देशाच्या संवैधानिक व्यवस्थेची संपूर्ण वाट लावलेली आहेच. परंतु या सगळ्यात हे जे काही चालू आहे हेच जर महाविकास आघाडीबाबत घडले असते, सरकार स्थापन करण्यास वेळ लागला असता तर कधीचीच राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली असती, असा टोला जितेंद्र आव्हाड यांनी लगावला.